मक्याचे केस / कॉर्नरोज

लेखनः कैमिल यारब्रो, चित्रः कैरल बायार्ड

मराठी: अश्विनी बर्वे



आई आणि आजी आपल्या नाजूक बोटांनी वेगवेगळ्या प्रकारच्या वेण्या घालतात आणि त्याचबरोबर हळूवार आवाजात गोष्टी सांगतात,जेव्हा त्या आपल्या मुलांच्या वेण्या आफ्रिकी शैलीने घालत, तेव्हा त्या वेण्यांमध्ये मक्याचे मऊसर सोनेरी केस सुद्धा जोडत असत.

वेण्याचे अनेक प्रकार असून त्यांना विशिष्ट अशी नावे आहेत आणि आफ्रिकन लोकांच्या संपन्न परंपरा आजही वर्तमानाशी जोडलेल्या आहेत आणि त्यांना सशक्त असा अर्थ आहे. जेव्हा त्या वेण्या घालण्याचे काम करतात, तेव्हा बहिणी आणि माझ्या छोटा भाऊ सुद्धा त्या परंपरा समजून घेतात आणि म्हणजे ते सुद्धा एकमेकांना त्याबद्दल सांगू शकतात.


कॅमिल यारब्रोची काव्यात्मक गोष्ट आफ्रिकेतील या विशिष्ट शैलीबद्दल सांगते आणि कॅरल बायार्डची चित्रे या सुंदर फॅशनला जिवंत करतात.

मक्याचे केस

लेखनः कैमिल यारब्रो

चित्रः कैरल बायार्ड

मराठी: अश्विनी बर्वे



आई आणि वडिलांनी

जे आधी केले होते

जे ते करू शकतात

आपल्या काळात आपल्या पद्धतीने

त्यामुळे ते आपल्या मुलांना याची जाणीव करून देतात की जे उद्या होणार आहे

ते होणारच आहे.



नमस्कार माझे नाव सिस्टर आहे. माझे दुसरे नाव शर्ली एन आहे, पण सर्वजण मला सिस्टर म्हणूनच हाक मारतात. हा माझा छोटा भाऊ माईक आहे. त्याला सगळे ब्रदर म्हणतात. आई म्हणते की दक्षिणेत, जिथे माझा जन्म झाला तिथे मुलांना हाक मारण्याची हीच पद्धत आहे. पण तुम्हांला माहीत आहे का? मी माझ्या भावाला मिंटू म्हणून हाक मारते. कारण मी जे करते ते त्याला करायचंच असतं.

जसे की मी जेव्हा आईला विचारते की अंधार होईपर्यंत मी बाहेर खेळू शकते का? मिंटूला लगेच विचारायचे असते की मी पण जाऊ का? तो एकदम छोटा मुलगा आहे. पण आम्ही एकमेकांबरोबर मजा पण करतो.

आता आम्ही आत जात आहोत, आई आणि आणि आजीच्या खूप साऱ्या कहाण्या ऐकण्यासाठी. प्रत्येक संध्याकाळ किश्श्यांची असते. आणि ऊऊऊऊ,ऊऊऊऊ, ऊऊऊऊ! त्या दोघी खूप मस्त शैलीदार गोष्टी सांगतात.



जेव्हा काल आम्ही आत गेलो तेव्हा आजी आईच्या केसात मक्याचे केस (कॉर्नरोस) गुंफत होती. त्या वेण्यांना आजी हेच म्हणते. ती म्हणाली अशाप्रकारे वेण्या घालण्याच्या शैलीला त्यांच्या घरातली मोठ मोठी माणसे हेच कॉर्नरोस म्हणत असत. कारण ते शेतात मका पेरत असत. आणि मक्याच्या पिकांची रांग या वेण्यांसारखी दिसत असे. आईचे केस खूप सुंदर दिसत होते. म्हणून मी म्हटले, “आजी माझ्या पण वेण्या घालून दे ना,” मग लगेच मेभी पण म्हणाली, ”आजी माझ्या पण वेण्या घालून दे ना.”

तेव्हा मी विचारले, “आई तुझ्या केसांची जी वेणी घातली आहे त्याला काय म्हणतात?” जाहीर आहे मेभी ने पण तेच विचारले, “आई तुझ्या केसांची जी वेणी घातली आहे त्याला काय म्हणतात?”



सोडून दया! आई आणि आजी दोघीही हसू लागल्या. दोघी खुश होत्या. रोज जेव्हा आई कामावरून येई,तेव्हा त्या दोघी गप्पा मारत आणि अलबामा मध्ये त्या राहत असतानाच्या आठवणी काढून खूप हसत.

कधी तर आम्हाला बाहेर खेळायला जाऊ का? हे विचारावेही लागत नसे आई आणि आजी स्वतःच म्हणत, “पोरानो आता तुम्ही बाहेर जाऊन खेळा.”

आईचे वेणी घालून झाल्यावर, ती उठली आणि आरश्यासमोर स्वतःला मागूनपुढून बघू लागली, जशी काही ती नाच करायला जात आहे. किंवा वडिलांनी आणलेला ड्रेस तिने घातला आहे आणि ती स्वतःला न्याहाळत आहे. ती खाली वाकली आणि तिने माझ्या पाप घेतला.

जेव्हा तू विचारते ना ,याला काय म्हणतात, या वेणीला काय म्हणतात तेव्हा मला खूप आनंद होतो, केसांची या प्रकारे वेणी घालतात त्याला म्हणतात ‘युरू, योरुबामध्ये त्याचा अर्थ होतो, टोकरी/पाटी

मेभी म्हणाली, “टोकरी?”

आजी म्हणाली, “हो, टोकरी”

तेव्हा बुद्धू मेभी हसत हसत फरशीवर पडला.

जेव्हा आजी म्हणाली, “बेटा! तेव्हा तो पटकन उठला, कारण त्याला माहीत होते की आजी त्याला एक चापट मारेल.”

मी आईला विचारले, “आई तू त्या टोकरी /पाटीत काय ठेवणार आहेस?”

आई म्हणाली, ”मी विचार करते प्रेम!”



तेव्हा पाय मुडपून बसलेल्या मेभीने आईला विचारले, “आजी तू तुझ्या टोकरीत काय ठेवशील?”

आजी म्हणाली, “मी ही विचार करते आहे की प्रेमच ठेवायचा.”

तेव्हा मेभीने विचारले, “आजी,जर मी पडलो तर प्रेम पण खाली पडेल का?”

“नाही रे बाळा!” ती म्हणाली. “कारण ते प्रेम तुझ्या टोकरी/पाटी सारखेच तुझा एक भाग होईल.”

म्हणून मी आजीला विचारले, “तू त्या टोकरीत कशा प्रकारचे प्रेम ठेवशील?”

“दुसऱ्यांनी केलेले प्रेम, माझ्या बाळा,” ती म्हणाली.

तेव्हा मेभीला पण काही विचारावे वाटले, “आणि माझ्या टोकरीत कशाप्रकारचे प्रेम ठेवशील आजी?”

“दुसऱ्यांकडून मिळालेले प्रेम माझ्या सोन्या,” ती म्हणाली.

तेव्हा आजीने मेभीला कुशीत घेतले आणि ती गुणगुणू लागली. तसेच जसे ती चर्चमध्ये गुणगुणत असे. ती म्हणाली, “जर तू पडला तरी दुसऱ्यांनी दिलेले प्रेम कुठेही जाणार नाही, कारण तो तुझ्या आयुष्याचा भाग झालेला आहे. अगदी त्या टोकरी सारखे, जी मी तुझ्या घालून तयार करेल.”



तेव्हा आईने मला मोढा घेऊन बसायला सांगितले, म्हणजे ती माझे केस आवरून देईल. आई आणि आजी कोणतीही गोष्ट सांगण्याआधी काहीतरी गुणगुणत असत. त्या म्हणतात की त्यामुळे त्या तो भाव पकडू शकतात.

जेव्हा मी आईला घाईने काही गातांना ऐकले,मी तिच्यासमोर लगेच बसले आणि म्हटले, “आई मला मक्याच्या केस वेणीत गुंफून घातलेल्या वेणीची गोष्ट सांग ना.”

मेभीने पण लगेचच आजीकडे बघितले आणि म्हणाला, “आजी मला पण मक्याचे केस वेणीत गुंफल्याची गोष्ट सांग ना.”

आई गाऊ लागली.

ऊऊऊउम,सांगते मी मक्याचे केस वेणीत गुंफलेल्या केसांची कहाणी...

आणि आजीने पण म्हटले,

उम उम उम,उम!

सांगते मी मक्याचे केस वेणीत गुंफण्याची कहाणी....

मग आजीने मेभीला पण छोट्या खुर्चीवर बसवले म्हणजे तिचे हात त्याच्या डोक्यापर्यंत पोहचू शकतील, आणि म्हणाली:

या मुलांनो, या माझ्याजवळ बसा,

सांगते तुम्हाला तुमच्या वंश-वृक्षाची कहाणी.

सजवेल तुला एका राजकुमारासारखे’

तेव्हा सुचेल एक चांगले नाव,

तुला आणि मला, दोघांनाही.

आणि गुंफेल तुझे केस,

आणि घालीन तुझी वेणी



यानंतर आम्ही एकदम शांत झालो,

आणि आजीने कहाणी सांगायला सुरुवात केली:

तुमच्या आत एक मूळ आहे. ते वाढत जाते. ते कधी मरत नाही. कधी तुम्ही जेव्हा घाबरतात, तेव्हा ते थरथरते, आणि जेव्हा तुम्हाला वेदना होतात तेव्हा गुडघे टेकायला तयार होतात.त्याची हालचाल मंद होते. पण ते मरत नाही. खूप पूर्वी, ज्या देशाला आफ्रिका म्हणतात, तेथील लोक म्हणजे आपले पूर्वज त्या मुळानुसार काम करत राहिले. म्हणजे जीवनाला अर्थ देऊ शकतील. आणि प्रशंसा करू शकतील. आणि आपल्या मुळा नुसारच त्यांनी अनेक प्रतिके बनवले, साहसाची, सन्मानाची, बुद्धिमानतेची, आणि प्रेम आणि ताकदीचे प्रतिके तयार केले. प्रतिके नेहमी जिवंत राहतात. फक्त प्रशंसा करण्यासाठी.








तेव्हा आई म्हणाली:

काही प्रतिकांनी शाही चौकांचे रूप घेतले.






काहींनी नक्षीने तयार केलेल्या वस्तूंचे



आणि काहींनी उपोषणात मुखवट्यांच्या नृत्यांचे





आणि काहींनी गुंफलेल्या वेणीतून







मैंभीने आईला विचारले, “गुंफलेले केस कोण ठेवत होते?”

“अरे अनेक लोक,” आई म्हणाली. “जिथे बघाल,जवळपास ज्यांनाही बघशील. मिस्र ते स्वाज़ीलैण्ड पर्यंत लोक सेनेगल ते सोमालीपर्यंत लोक.”



तुमच्या केसांची वेणी गुंफण्याच्या शैलीने तुम्ही त्यांचा समाज, त्यांचे गाव, ओळखू शकतात.


त्या काळी योरुबा लोक तीस किंवा त्यापेक्षा अधिक वेण्या घालत असत.

तुम्ही राजकुमार, राणी आणि नवरी ओळखू शकत असत. त्यांच्या वेण्यांच्या संख्येने...

तुम्ही त्या देवतांना ओळखू शकत असत,

ज्यांची ते पूजा करत असत.

त्यांच्या वेणी घालण्याच्या शैलीतून ओळखत असत.



‘‘तेव्हा एक भयानक गोष्ट घडली.”
मी विचारले काय झालं आई?”
कबीला,
गाव,
पुरोहित,
नवरी,
शाही परिवार,
सगळ्यांना गुलामांच्या जहाजात कोंबले
त्यांना समुद्राच्या पलीकडे घेऊन गेले..
तिथे त्यांना साखळदंडाने बांधून मजुरांच्या टोळ्यांमध्ये लिलावासाठी उभे केले.
जिथे ते आगीच्या जवळ आणि देवदार वृक्षाला लटकून उभे केले. आणि ज्या शैलीची प्रशंसा होत होती त्याची आता लाज वाटू लागली. त्याचे अर्थ आता पूर्ण बदलले. त्यांची नावं विसरून गेले.





मेभीने आजीला विचारले, “यामुळे आत्मा/मूळ मरून गेले का?”

आणि आजी म्हणाली:

असे झाले नाही!

जर तुम्ही एकदम गप्प झालात,

तर तुम्ही अजूनही शाही गोष्ट नष्ट झाल्याचे ऐकू शकतात.

तुम्हाला हवेत मूळ/आत्मा जाणवतो,

आसपास बघितले तर जुने प्रतिके बघू शकतात

ज्याला आज आपण मक्याचे केस म्हणतो,

त्या प्रतिकात तुम्ही तुमचे मुळं/आत्मा बघू शकतो.

तो काळ, ते ऐश्वर्य, स्थान, जमातीतून बदलला नाही,

न तिरस्कार, ना लाज,

कधीच नाही...समजून घे,

मुळं च प्रतिके तयार करतात आणि मुळांची अनेक नावं आहेत,

तेव्हा आईने म्हटले:

छोटी मुलगी, छोटा मुलगा,

चला खेळू या वेण्याच्या प्रकाराचे खेळ..

रोज नवीन एक शैली,

रोज एक नवीन नाव



मेभी म्हणाला, “आधी मी! आधी मी!पण मला काय नाव मिळेल आजी?”

आजी म्हणाली, “ती सांगेल, आपल्या आईचे म्हणणे ऐक.”

आणि आई म्हणाली,

तू त्याचे नाव एखाद्या नदीवरून ठेवू शकतो,

तू त्याचे नाव एखाद्या फळावरून ठेवू शकतो,

एखाद्या सालावरून किंवा महिन्यावरून

एखाद्या दिवसावरून किंवा काळाच्या एखाद्या प्रहरावरून

आम्ही टाळ्या वाजवू लागलो, पण आजीने म्हटले,

“तुझी खोपडी सरळ ठेव पोरा.”

तू तिचे नाव एखाद्या कवितेवरून ठेवू शकतो,

किंवा शहरावरून किंवा शाळेवरून

किंवा एखादा सोनेरी नियमावरून


तू त्याचे नाव एखाद्या हिरोवरून ठेवू शकतो,

एखादी म्हण किंवा एखादा माश्यावरून,


एखाद्या ताऱ्यावरून किंवा

एखाद्या गाण्यावरून किंवा

एखाद्या इच्छेवरून नाव ठेवू शकतो.



मी विचारले, “आम्ही त्या कशा घालू?”
आजी म्हणाली:
खालून घालायला सुरुवात कर
वरून घालायला सुरवात
उभे राहून घाल नाहीतर खाली बसून घाल,
गोलाकार चक्रासारखी घाल,
त्याचा कोन तयार कर,
मग त्या एखाद्या मुकुटासारखा घाल



‘‘पण आम्ही कोणत्या शैलीत घालू?”
आजी म्हणाली,
तडकभडक शैलीत घाल,
साध्या शैलीत घाल,
बिया किंवा कवड्या गुंफून घाल,
रिबिनीने सजवून घाल
हतीच्या दाताने सजव,
मणी आणि वाजणाऱ्या घंट्या गुंफून सजव...





तेव्हा मेभीने पण विचारले, “आई आम्ही याचे नाव काय ठेवू?”

आई म्हणाली:

ठेव नाव रॉबसन,

नाहीतर माल्कम

डॉ.किंग ठेवू शकतो

किंवा ठेव डूबॉइस,

गार्वी, असे नाव जे तुम्ही गाऊ शकाल.

नाव ठेव टबमॅन

हेरिएट नाव ठेव

किंवा वाटलं तर त्या शैलीला फौजी लू म्हण,

नाहीतर न्जिंगा, रोजा पार्क, नाहीतर हॅटशपसूट सुद्धा ....



घे नाव पॉवेल,
नाव ठेव कार्व्हर,
रिचर्ड राइट, आणि लैंगस्टन ह्यूस,
घे नाव त्याचे बैलाफौंटे,
किंवा ठेव बॉल्डविन,
नाव ठेव ग्लोरी
किंवा ब्ल्यूस् ...



नाव ठेव मिरियम
कैथरीन डनहैम,
मेरी बैथ्यून आणि जोसेफीन
किंवा अरीथा
म्हण तिला पुजारीन किंवा राणी





यावेळेपर्यंत माझ्या केसांत मक्याचे अनेक केस गुंफले गेले होते.
मेभीच्या केसात सुद्धा
आजी म्हणाली छोट्या मुली, छोट्या मुलामक्याच्या केसातल्या
शैलीत तुमचे चेहरे किती सुंदर दिसतात थे बघा, तुमची लोभस
हसू बघू दया.
आता काय नाव ठेवलं याचं
मी माझ्या शैलीचे नाव लैंगस्टन ह्यूसच्या नावावरून ठेवले,
कारण मी त्यांची एक कविता ऐकली होती. पण मेभीने आपल्या
शैलीचे नाव शैली ‘बैटमैन’ ठेवले. तो एकदम छोटा मुलगा आहे.





तेव्हा बाबा कामावरून घरी आले आणि ते म्हणाले की तुम्ही इतके छान दिसत आहात की जेवण झाल्यावर काहीतरी चांगले ऐकायला घेऊन जाईन आणि नेले पण त्यांनी.

लेखिके बद्दल

केमिल यारब्रो केमिल यारब्रो लेखना शिवाय एक उत्तम अभिनेत्री, संगीतकार आणि गायिसुद्धा होती. त्यांनी टेलिविज़न आणि रंगभूमीवर विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या. *टु बी यंग, गिफ्टेड, एण्ड ब्लैकची* न्यूयॉर्कमध्ये सादर केल्यानंतर तिने ते इतर ठिकाणी सुद्धा सादर केले आहे. त्यांनी *द आइरन पॉट कुकरची* गाणी व संवादाचे रिकॉर्डिंग केले, ज्याची खूप प्रशंसा झाली, आणि त्यांना जैज/फोक/एथनिक परफॉर्मेन्स साठी नैशनलएनडॉउमेंट फॉर आर्टस् फैलोशिप मिळाली.

शिकागोची मूळ निवासी मिज़ यारब्रो आता न्यूयॉर्कमध्ये राहते आहे.

चित्रकाराच्या बाबत

कैरल बायार्डचा जन्म न्यू जर्सीच्या अटलांटा शहरात झाला होता. त्यांनी आधी फिलैडैल्फियाच्या फ्लैचर आर्ट मैमोरियल मध्ये अध्ययन केले आणि नंतर न्यू यॉर्क सेंटर फॉर डिज़ाइनमध्ये अभ्यास केला. बायार्ड आपल्या चित्रांसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांनी अनेक लहान मुलांच्या पुस्तकासाठी चित्रे काढली. ज्यात एलोइस ग्रीनफील्डची एलीशिया डू, तसेच अटेइस रॉबिनसनची थ्री एफ्रिकन टेल्स सामील आहेत. त्यांची चित्रे अनेक कई एकल व सामूहिक प्रदर्शनांमध्ये दाखवली गेली आहेत. त्यांचा न्यू यॉर्क मध्ये कलेच्या शिक्षण कार्यक्रमात सक्रिय सहभाग आहे.